# पालघर जिल्हा परिषदेचा ५१ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## पाणीपुरवठा, शिक्षण, रस्ते दुरुस्ती, शेती विषयक योजनांवर भर



प्रस्तावित सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात विविध विभागांकरिता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीचा तपशील

**मूळ अर्थ संकल्प २०२२-२३**



| | |
|---|---|
| मा.अध्यक्ष मानधन ई. | १ कोटी १३ लाख २१ हजार |
| सामान्य प्रशासन | ५० लाख १ हजार |
| शिक्षण | ३ कोटी ४ लाख ५० हजार |
| सार्वजनिक बांधकाम | ३ कोटी ३० लाख ५२ हजार |
| पाटबंधारे व जलसंधारण | २ कोटी २ लाख |
| सार्वजनिक आरोग्य | २ कोटी ९७ लाख ३ हजार |
| पाणीपुरवठा | ९ कोटी १८ लाख १० हजार ३५४ |
| कृषी | २ कोटी ६० लाख |
| पशुसंवर्धन | १ कोटी ९२ लाख १ हजार |
| वने | ४ लाख ७३ हजार |
| समाजकल्याण | ४ कोटी ४ लाख ३ हजार |
| दिव्यांग कल्याण | १ कोटी २५ लाख १ हजार |
| महिला व बाल कल्याण | २ कोटी २० लाख ७६ हजार |
| ग्रामविकास, वित्त, प्रशासन | १७ कोटी ०२ लाख १ हजार |
| एकूण महसूली खर्च | ५१ कोटी २३ लाख ३५४ |

**पालघर : पुढारी वृत्तसेवा**

पालघर जिल्हा परिषदेचा सन २०२१-२२ चा सुधारीत आणि सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प जिल्हा वित्त सभापती शीतल धोडी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १३७नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे सादर केला. यावेळी ५१ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

हा अर्थसंकल्प जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष वैदेही वाढाण यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सांबरे, सर्व विषय समित्यांचे सभापती, सर्व जिल्हा परिषद सदस्य सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, सिद्धाराम सालिमठ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी नितिन ओगले, सर्व विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत पार पडला.

सन २०२१-२२ च्या सुधारित अर्थसंकल्पात आरंभीच्या शिल्लकेसह महसूली जमा रक्कम रु.४१,९४,७५,०००/- (४१ कोटी ९४ लाख ) एवढी असून, महसूली खर्च रक्कम रु. २९,४४,३३,३१९/- (२९ कोटी ४४ लाख) इतका आहे.तर सन २०२२-२३चा मुळ अर्थसंकल्पीय अंदाज आरंभीच्या शिल्लकेसह महसूली जमा रक्कम रु.५४,७६,६३,४०९/- (५४ कोटी ७६ लाख) एवढी असून, महसूली खर्च रक्कम रु. ५१,२३,९२,३५४/- (५१ कोटी २३ लाख) इतका आहे.

महसुली जमेत पुढील वर्षीही मुद्रांक शुल्क अधिभार यांपासून मिळणारे उत्पन्न हाच प्रमुख स्त्रोत (५८%) असून. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी जि.प.द्वारे मोक्याच्या ठिकाणच्या जिल्हा परिषद मालमत्ता, जागा व इमारती यांच्या विकासातून मिळणारे भाडे, होरडिंग व इतर जाहिरातींपासुन मिळणारे उत्पन्न, आरोग्य व बांधकाम विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्र करिताचे शुल्क, बांधकामाच्या कामांतून आस्थापना शुल्क आकारणी, नियमित पाणीपट्टी व हातपंप शुल्काची वसुली अश्या स्वरूपाच्या सुधारणा हाती घेतलेल्या आहेत. मुद्रांक शुल्क व इतर शासकीय येणे थकबाकी मिळविण्यासाठी प्रशासनाकडून पाठपुरावा सुरु आहे. या उपाययोजनांसह पुढील आर्थिक वर्षातील उत्पन्नाचे लक्ष गाठण्यात येईल अशी माहिती वित्त विभागामार्फत देण्यात आली आहे.

### कंत्राटी शिक्षकांच्या मानधनासाठी अर्थसंकल्पात तरतूद

पालघर जिल्ह्यामधील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविणे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी विज्ञान प्रदर्शन भरविणे, जिल्ह्यातील स्कॉलरशिप प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे, इस्त्रोभेटीचे आयोजन, विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, कब-बुलबुल योजना, शिष्यवृत्ती परिक्षा फी भरणे व पुस्तकांचा पुरवठा करणे, पटसंख्या रोखण्यासाठी शिक्षक दुत नेमणूक करणे, जिल्ह्यातील बहुतांश शाळांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने शाळा दुरुस्ती, संरक्षण भिंत व शौचालय दुरुस्ती योजना शिक्षण विभागांमार्फत राबविण्यात येणार आहे. तसेच ९ वी, १० वी वर्ग, उर्दु भाषा शिक्षक यांची निकड लक्षात घेऊन कंत्राटी शिक्षकांच्या मानधनासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.



### आधुनिक शेतीच्या प्रोत्साहनासाठी योजना

पालघर जिल्ह्यातील शेती व्यवसायास चालना देण्यासाठी महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना सुधारित कृषि अवजारे पुरवठा, किडरोग नियंत्रण, शेतकऱ्यांना बियाणेसंच पुरवठा करणे,मोगरा लागवडीसाठी / फुलशेती व रेशीम उदयोग साठी अर्थसहाय्य, कृषी कर्ज मित्र योजना, आधुनिक शेतीस प्रोत्साहन देणे व नाविण्यपुर्ण योजना राबविणे या योजना या अर्थसंकल्पात समाविष्ट आहेत. पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुवैद्यकीय संस्थांची इमारत देखभाल-दुरुस्ती, सुशोभिकरण व विस्तारीकरण करणे, महिला पशुपालकांना दुधाळ जनावरे खरेदीसाठी अर्थसहाय्य करणे व आपातकालीन परिस्थितीत दगावलेल्या जनावरांच्या पशुपालकांना अर्थसहाय्य करणे या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश करणेत आलेला आहे.

### कोल्हापूर टाईप बंधाऱ्यांचा समावेश

सार्वजनिक बांधकामविभागाअंतर्गत ग्रामिण मार्ग व इतर जिल्हा मार्ग, रस्ते दुरुस्ती अंतर्गत वर्गीकृत व अवर्गिकृत, जि.प. अखत्यारितील पुल, मोऱ्या, अनुषंगिक दुरुस्तीची कामे, रस्ते मजबुतीकरण, तालुकास्तरावरील कार्यालयीन इमारत देखभाल दुरूस्ती करणे या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलेला आहे. तसेच, पाटबंधारे विभागामधील कोल्हापूर टाईप बंधारे दुरुस्तीसाठी व इतर योजनांसाठी निधी अर्थसंकल्पीत केलेला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांना सर्पदंश/विंचुदंश/श्वानदंश लस औषध पुरविणे, प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा पुरविणे, दुर्धररोगांच्या उपचाराकरिता आर्थिक मदत करणे, बाल उपचार केंद्र कार्यान्वीत ठेवणे, व्हझ्य अंतर्गत शस्त्रक्रिया झालेल्या बालकांचे पालकांना बुडीत मजुरी देणे या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलेला आहे.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य

पालघर जिल्ह्यातील सामाजिक विकासाच्या अनुषंगाने समाजकल्याण विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय, मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधणे, स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय, जि.प. मालकीच्या अनुदानीत वस्तीगृहाच्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे, नवीन घर बांधणेसाठी अथवा दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणे, ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना सायकली पुरविणे, समाजमंदीराचे ग्रंथालय/अभ्यासिकेत रूपांतर करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे या योजनांसाठी या अर्थसंल्पात समावेश करण्यात आला आहे.

### जिल्हा परिषदेचे कामकाज गतिमान होणार

जिल्हा परिषदेचे नवे संकेतस्थळ यापूर्वीच तयार झाले असून, निवृत्ति वेतन प्रकरणे विहित वेळेत मंजूर करण्यासाठी व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी इत्यादी योजनेचा कामकाज सुलभ करण्यासाठी वेबपोर्टल व ॲप सुद्धा कार्यान्वित केलेले आहे. जिल्हा परिषद मार्फत होणारा सर्व आर्थिक व्यवहार वित्त विभागाने नझक्रड प्रणालीद्वारे १००% ऑनलाईन झालेला आहे. जिल्हा परिषदेचे कामकाज गतिमान होण्याकडे ही अश्वासित पावले आहेत.

### डिजीटल लायब्ररी तयार करण्यावर भर

सार्वजनिक आरोग्य विभागाकडील मनुष्यबळाची कमतरता पाहता वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, सहायक परिचारिका प्रसाविका यांचे मानधनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत जि.प.सर्व विभागाच्या कोर्ट, कचऱ्यांचे दावे, वकील फी देणे, जि.प.योजना जाहीराती प्रसिध्दी व प्रचार करणे, जि.प. व विविध समित्यांचे मा. पदाधिकारी / अधिकारी अभ्यास दौरा व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, जिल्हा पातळीवर क्रीडास्पर्धाव सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करणे, कार्यालयीन सुरक्षा व स्वच्छता करणे, डिजीटल लायब्ररी तयार करणे या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलेला आहे. सभागृहापुढे सादर अर्थसंकल्पास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली.





### पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्तीसाठी २० टक्के निधीची तरतूद

जिल्हा परिषदेचा सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प तयार करताना शासन निर्णय, अधिसूचनांप्रमाणे जिल्हा परिषद उत्पन्नाच्या ठराविक जमेच्याबाबींच्या आधारे निश्चित केल्यानुसार वैधानिक खर्चासाठी समाजकल्याण विभागासाठी २०%, पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्तीसाठी २०%, महिला व बालकल्याण विभागासाठी १०%, दिव्यांग कल्याणासाठी ५%, शिक्षण विभाग शाळा देखभाल व दुरुस्तीसाठी ५% रक्कम अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

### दिव्यांग शेतकऱ्यांना कृषी साहित्यासाठी तरतुद

जिल्ह्यातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी दिव्यांगाचे सर्व्हेक्षण करणे, दिव्यांग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य करणे, दिव्यांग शेतकऱ्यांना कृषी पुरक साहित्याचा पुरवठा करणे, दुधाळ जनावर खरेदीसाठी अर्थसहाय्य करणे या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यातआला आहे. महिला व बाल विकासाच्या अनुषंगाने महिलांना कायदेशीर सल्ला देणे, मुलींना सायकल पुरविणे, संगणक प्रशिक्षण देणे, अंगणवाडी केंद्र दुरुस्ती तसेच महिलावमुलींच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक तरतूद करण्यात आली आहे. विटभट्टीवरील स्थलांतरित मजूरांची आरोग्य तपासणी, कुपोषित मुलांसाठी, गरोदर व स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार पुरविणे, मुलींना कन्यादान साहित्य वाटप, सॅममुक्त ग्रामपंचायतींना बक्षिस देणे,तृतीय पंथीय घटकातील व्यक्तींसाठीस्वयंरोजगार देणेया योजनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आलेला आहे.

> सर्वसामान्यांचा विचार करूनच हा अर्थसंकल्प तयार केला आहे. सर्व सभापती, सदस्य, खातेप्रमुख विशेषतः मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मेहनतीने जनतेला उपयोगी असा अर्थसंकल्प बनवण्यात आला आहे.
>
> **-वैदेही वाढाण,** जिल्हा परिषद अध्यक्ष

> हा अर्थसंकल्प मी पालघर जिल्ह्यातील कष्टकरी शेतकरी, येथील मूलनिवासी, महिला व बालक तसेच जिल्हा परिषदेच्या सेवा शेवटच्या घटका पर्यंत पोहचविण्यासाठी अत्यंत कमी मनुष्यबळात कार्यरत असणाऱ्या जिल्हा परिषद यंत्रणेस समर्पित करते. तसेच कोरोना नंतरच्या काळात जिल्हा परिषदेची कर्तव्य पार पाडण्यासाठी समर्थ ठरेल.
>
> **-शीतल धोडी,** वित्त समिती सभापती

> पालघर जिल्हा हा आदिवासी जिल्हा आहे. या जिल्ह्यातील गरीब तलासरी जव्हार मोखाडा या भागातून मोठ्या प्रमाणात रोजंदारीवर काम करण्यासाठी शहराकडे स्थलांतर होत असतो. हे लोक विटभट्टी कामगार, नाका कामगार रोजंदारी वर काम करत आहेत. अश्या लोकांच्या मुलांसाठी वस्ती शाळा तयार करण्याची गरज आहे. अनेक लहान मुले पालकांसोबत गाव सोडतात म्हणून ते आश्रम शाळांत जात नाही. या लोकांसाठी अर्थसंकल्पात तरतूद नाही.
>
> **-दिनेश पवार,** अध्यक्ष पालघर श्रमजीवी संघटना

> पालघर जिल्ह्याचा विकास करण्याची गरज असताना अर्थ संकल्पात केवळ आकडेवारीत खेळून चालणार नाही. जिल्ह्यात ग्रामीण भागात पिण्याचे पाणी लोकांना मिळत नाही. त्यांच्यासाठी नळ पाणीपुरवठा करण्यासाठी निधी तुटपुंजा आहे. जव्हार, मोखाडा तलासरी भागावर अन्याय करणारा हा अर्थ संकल्प आहे. ग्रामीण भागातील शाळांचा स्तर उंचावण्यासाठी दिला गेलेला निधी कमी आहे. शाळांच्या इमारती, स्वच्छता गृह यांची अवस्था खूप वाईट झाली आहे. तसेच सर्वांगीण विकास करण्यासाठी पुरेसा निधी ठेवलेला नाही. थोडक्यात हा अर्थ संकल्प जुन्याच पुस्तकाला फक्त नवीन रंगीत कव्हर घालण्याचा प्रयत्न आहे.
>
> **-सुरेखा थेतले,** विरोधी पक्ष नेत्या पालघर जिल्हा परिषद.

# केळवे-माहीममध्ये शेकडो एकर जागेत मिरचीचे भरघोस उत्पन्न

## गोण्या एपीएमसीकडे रवाना; मिरचीबरोबरच ढोबळी मिरची, कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, भेंडी, तोंडली, काकडीचे घेतायेत पीक

**पालघर : मंगेश तावडे**

डहाणू तालुक्यातील अनेक गावांमध्ये मिरची उत्पादकांना ठसका लागला असला तरी केळवे माहीम परिसरातील शेतकरी मात्र मिरचीचे भरघोस उत्पन्न घेत आहेत. गेल्या दोन वर्षांत कोरोनाच्या सावटामुळे मिरची पिकवूनही सदर माल वाशी मार्केटमध्ये पाठविण्यात आला नाही. यावर्षी मात्र परिसरात मिरचीचे मळे अद्यापही हिरवेगार दिसत आहेत. शेकडो एकर जागेत मिरचीचे उत्पन्न समाधानकारक मिळत असून सोसायटीच्या मदतीने पालघरची मिरची सर्वदूर पाठविण्यात येत आहे.

पालघर जिल्ह्यात समुद्र किनाऱ्यापासून २० ते २५ किलोमीटर परिसरात मोठ्या प्रमाणावर शेती करण्यात येते. यामध्ये मिरची, ढोबळी मिरची, कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, भेंडी, तोंडली, काकडी, तूर तसेच अनेक प्रकारच्या भाजीचे उत्पादन घेण्यात येते. मात्र, ही भाजी जिल्ह्याबाहेर जात असल्याने पालघरच्या जनतेला अन्य ठिकाणांहून येणाऱ्या भाजीपाल्यावर अवलंबून राहावे लागते. सध्या पाठविण्यात आलेली हिरवी मिरची १०० रुपये किलोप्रमाणे व्यावसायिक शेतीतून उचलत आहेत. मात्र, हीच मिरची दोन दिवस झाले तरी ताजी आणि टवटवीत राहत असल्याने ती किती रुपये किलोने विक्री होते, याची माहिती स्थानिकांना ज्ञात नसल्याचे समजते. मात्र, आज रोख उद्या उधार नसला तरी कालचे पैसे आज देवून दुसऱ्या दिवशीचा माल उचलण्यात येईपर्यंत आदल्या दिवशीचे पैसे देवून त्या दिवशीचा माल निर्यात केला जातो.

### कामगारवर्गालाही मिळतोय मोठ्या प्रमाणावर रोजगार



सध्या या भागात मिरची उत्पादनावर विशेष भर देण्यात आला आहे. कामगारवर्गही मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. अनेक शेतकऱ्यांची शेकडो किलो मिरचीची निर्यात दिवसभरात होते. यापूर्वी भेंडी, दुधीसारख्या भाजीची पिके घेतली जात असत. मात्र, मिरचीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर येत असल्याने शेतकरी मिरची पिकाकडे वळला आहे. या परिसरात हिरवागार मळा पाहिल्यानंतर मन आनंदित होत असल्याचेही पाटकर यावेळी म्हणाले.

दरम्यान, सध्या हिरव्या मिरचीचे तीन पाडे देण्यात आले आहेत. मात्र, चौथ्या पाड्यावेळी मिरचीच्या झाडाला एखाद दुसरी मिरची पिकलेली (हिरवी पण लाल झालेली) पाहायला मिळते. ही लाल झालेली मिरची उन्हामध्ये सुकवून ती शेकडो रुपये किलोने सुद्धा विकण्यात येते. त्या मिरचीचा मसाला पूड करण्यासाठी वापर करण्यात येतो. सध्या उकाडा वाढला असून त्याचा परिणाम मिरचीवर होण्याची शक्यता आहे. डहाणू तालुक्यात ज्या प्रकारे मिरची उत्पादनाची हानी होत आली आहे ती हानी केळवे माहीम परिसरातही होवू शकते, अशी प्रतिक्रिया प्रगतीशील शेतकरी नितीन पाटकर यांनी सांगितले.

Scanned with CamScanner